पीएच.डी संशोधन आराखडा

"मराठी ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास"

(विशेष संदर्भ:- बारोमास, गावखोरी, धुळपेरणी, तुडवण, कुरंगीपाडस, बारदाणा)

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती

पीएच.डी पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

या विद्यापीठास सादर करावयाचा शोध प्रबंधाचा प्रस्तावित आराखडा

संशोधक

साईनाथ रामचंद्र काकडे

एम. ए., बी. एड (मराठी)

मु.पो. आरळ, ता. वसमत, जि. हिंगोली

मो. 9075793944 ई-मेल:-sainathkakde123@gmail.com

मार्गदर्शक

प्रा. डॉ. कदम सुरेश व्यंकटराव

सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग)

राजर्षी शाहू महाविद्यालय, परभणी

मो. 9420531314

ई-मेल:- drsureshkadam11@gmail .com

डिसेंबर-2024

अ. क्र .	तपशील	पृष्ठ क्रमांक
१	प्रस्तावना	
२	संशोधनाचे उद्‌दिष्टे	
३	संशोधनाचे महत्त्व	
४	संशोधनाची गृहितके	
५	संशोधन पद्‌धती	
६	विषयाची व्याप्ती व मर्यादा	
७	विषय निवडीची भूमिका	
८	संशोधन प्रकरणाची रचना	
९	संदर्भ ग्रंथ सूची	

प्रस्तावना:-

वाङमयाच्या इतिहासात अगदी अलीकडच्या काळात उदयाला आलेला वाङमय प्रकार म्हणून कादंबरी या वाङमय प्रकाराकडे पाहिले जाते. असे असले तरी फार प्राचीन काळापासून मानव एकमेकांना कथा सांगत आणि एकमेकांच्या कथा ऐकत आलेला आहे. याच कथांचे दीर्घरूप म्हणजेच कादंबरी होय. तसा साहित्याचा आवाका खूप व्यापक आहे. तरी देखील त्यात कादंबरी हा वाङमय प्रकार खूप महत्त्वाचा आहे. साहित्याच्या कादंबरी या वाङमय प्रकारातून मानवी जीवनातील वास्तव दर्शन सूचकपणे मांडले गेले.

कादंबरीत येणारा जीवनपट हा एका विशिष्ट काळाचे, समूहाचे, समूहातील घटकाचे, समधर्माच जातीचे, धर्माचे, प्रदेशाचे, संस्कृतीचे आणि संस्काराचे दर्शन घडवत असतो. यामुळे कादंबरी वाङमय प्रकार हा वेगवेगळे उपप्रकार मध्ये विभागला गेला आहे. म्हणूनच साहित्यामधील कादंबरी या वाङमय प्रकाराचे सामाजिक कादंबरी, दलित कादंबरी, ग्रामीण कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, पौराणिक कादंबरी, स्त्रीवादी कादंबरी, राजकीय कादंबरी असे विविध उपप्रकार आढळून येतात. कादंबरी वाङमयाच्या त्या प्रत्येक उपप्रकारातून पुढे आलेली कादंबरी बऱ्याच वेळा ग्रामीण जीवनातून वाटचाल करताना दिसून येते. म्हणून मराठी ग्रामीण साहित्यात कादंबरी वाङमय प्रकाराने आपले वेगळे असे स्थान निर्माण केले आहे.

सामान्यपणे मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून बाब पद्मजी यांच्या सन 1857 साली प्रकाशित झालेल्या ‘यमुना पर्यटन’ या कादंबरीकडे पाहिले जाते. तर हरी नारायण आपटे यांची सन 1893 साली प्रकाशित झालेली ‘पण लक्षात कोण घेतो’ ही पहिली सामाजिक कादंबरी म्हणून ओळखली जाते. कादंबरी वाङमयाच्या वाटचालीत ‘काशीबाई कानिटकर’ यांचे नाव मराठीतील पहिल्या ‘स्त्री कादंबरीकार’ म्हणून पुढे आले. या वाटचालीत मागील दोन दशकात प्रकाशित झालेल्या सदानंद देशमुख यांच्या ‘तहान’,

'बारोमास', राजन गवस यांची 'तणकट', गणेश आवटे यांची 'भिरुड', रमेश इंगळे उत्रादकरांची 'निशाणी डावा अंगठा', जी. के. ऐनापुरे यांची 'अभिसरण', शेषराव मोहिते यांची 'धूळपेरणी', कैलास दौंड यांची 'तुडवण', 'पाणधुई', 'कापूसकाळ' नागनाथ गोरे यांची 'फेसाटी' बिराडकर अशोक पवार यांच्या 'पडझड', 'गावखोरी' रवींद्र पांढरे यांची 'पोटमारा', गणेश आवटे यांची 'कुरंगीपाडस', महेंद्र कदम यांची 'तणस' संजय जगताप यांची 'बारदाणा' या कादंबऱ्या मराठी साहित्यातील कादंबरी या वाङमय प्रकारात ग्रामीण कादंबरीची बळकट अशी वेगळी वाट सुचित करतात.

मराठी वाङमय क्षेत्रात ग्रामीण कादंबरी हा साहित्यप्रकार एवढा गतिमान होण्याचे कारण म्हणजे या साहित्य प्रकाराला रा. र. बोराडे, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, सरदार जाधव, विश्वास पाटील, गणेश आवटे, कैलास दौंड, वासुदेव मुलाटे, भारत काळे, अशोक कोळी, बिराडकर अशोक पवार आदी मान्यवरांचे पाठबळ मिळाले आहे आणि याशिवाय अनेक साहित्यकारांचे पाठबळ मिळत राहत आहे.

ग्रामीण कादंबरी हा साहित्यप्रकार गतिमान करण्यासाठी सन 2000 नंतर प्रकाशित झालेल्या कादंबऱ्या खारीचा वाटा उचलताना दिसून येतात. सन 2000 नंतर प्रकाशित झालेल्या ग्रामीण कादंबऱ्यातून ग्रामीण जीवन आणि ग्रामीण जीवनाचे प्रश्न अतिशय भावनात्मक आणि संघर्षाच्या पातळीतून पुढे येतात. त्यातुन ग्रामीण भागातील मुख्य घटक असलेल्या शेती व शेतकरी यांचे चित्रण फारच प्रभावीपणे व्यक्त झालेले आहे. याबरोबरच सुशिक्षित ग्रामीण तरुणांचे जगणे मांडताना या कादंबऱ्या दिसतात. तसेच गावगाड्या बरोबरच राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक बाबींच्या चांगल्या व वाईट बाजू पुढे करुन तेथिल रूढी, परंपरा, चाली-रीती, संस्कार व संस्कृती, आणि व्यक्ती रेखाटतात. असे असले तरी साहित्याच्या विकासाच्या दृष्टीने सन 2000 नंतरच्या ग्रामीण कादंबऱ्याचे समीक्षण अथवा संशोधन करणे महत्त्वाचे ठरते. उपरोक्त वरील सर्व बाबींचे गांभीर्य लक्षात घेऊनच संशोधन कर्त्याला संशोधनाचा सदरील विषय महत्त्वाचा वाटतो. सन 2000 नंतरच्या निवडक

ग्रामीण कादंबरी या विषयाच्या माध्यमातून ग्रामीण जीवनाचे स्वरुप तेथे असलेला संघर्ष आणि त्यातून मिळणारी प्रेरणा आदी बाबींचा शोध घेण्यासाठी हा विषय निवडला आहे.

संशोधनाचे उद्‌दिष्टे:-

"मराठी ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास" या संशोधनात्मक शोधप्रबंधानुषंगाने संशोधकाने काही उद्‌दिष्टे डोळ्यासमोर ठेवून प्रस्तुत शोध आराखड्याची मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

1) ग्रामीण माणसांचा स्वभाव, वृत्ती-प्रवृत्ती याचा शोध घेणे.
2) शेतकरी समाजाच्या वास्तवाचा शोध घेणे.
3) ग्रामीण भागातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, आणि राजकीय परिस्थितीचा विस्ताराने आढावा घेणे.
4) शेती व्यवसायाशी निगडित विविध कामांची सविस्तर माहिती घेणे.
5) सामूहिक संवेदनशीलता समजून घेणे.
6) आत्महत्या न करता उलट जगण्याची धडपड करणारी माणसे पुढे करणे.
7) शेतकऱ्याच्या जीवनातील मानसिक आणि भौतिक पातळीवरील संघर्षाचा शोध घेणे.
8) खेड्यातील समृद्ध बोली भाषेचा प्रत्यय दाखवून देणे.
9) व्यक्ती-समाज, गावगाडा-शहरीजीवन याची सांगड घालताना शिक्षणव्यवस्था, शेतीव्यवस्था, व्यापारबाधणी अशा समग्र चित्रणाचा शोध घेणे.
10) प्रभावी बोलीभाषा, अप्रतिम संवाद आणि निवेदन अचुक प्रंसग चित्रण आदी विशेषाचा शोध घेणे.
11) खेड्यातील तरुणाची होणारी होरपळ, घुसमट आणि धडपडीचा शोध घेणे.
12) भाषा ही माणसाच्या अस्तित्वाची खूण आहे हे दाखवून देणे.
13) प्रमाण भाषा 'आहे रे' वर्गाचे प्रतिनिधित्व आणि बोलीभाषा 'नाही रे' वर्गाचे प्रतिनिधित्व कशा पद्धतीने करतात याचा शोध घेणे.

14) शहरी मानसिकतेचे चित्रण दाखवून देणे.

15) ग्रामीण भागातील समस्यांचे, बेरोजगारीचे, बेभरवशाचे, हतबलतेचे, चंगळवादाचे, आर्थिक दुर्बलतेचे चित्रण दाखवून देणे.

16) ग्रामीण कादंबऱ्यांमधील कादंबरीचे बलस्थाने जाणून घेऊन त्यातील सौंदर्यस्थळांचा शोध घेणे.

17) ग्रामीण विशेषतः शेतकरी जीवनाचे दर्शन कसे घडविले हे पाहून त्याच्या जीवनातील समस्यांचा शोध घेणे.

संशोधनाचे महत्त्व:-

ग्रामीण साहित्यातून शेतकऱ्यांचे जीवन आणि त्यांच्या जीवनातील समस्या पुढे येऊ लागल्या. शेतकरी कुटुंबात जन्म घेणारे सुशिक्षित तरुणांच्या वाट्याला येणारी बेरोजगारी ग्रामीण कादंबऱ्यातून दिसून येते. यात प्रामुख्याने शेषेराव मोहिते यांची ‘धूळपेरणी’ (2001), सदानंद देशमुख यांची ‘बारोमास’ (2003), संजय जगताप यांची ‘बारदाणा’ (2004), बिराडकार अशोक पवार यांची ‘पडझड’ (2012), रवींद्र पांढरे यांची ‘पोटमारा’ (2016), नवनाथ गोरे यांची ‘फेसाटी’ (2017), महेंद्र कदम यांची ‘तणस’ (2019), कैलास दौंड यांची ‘तुडवण’ (2019), गणेश आवटे यांची ‘कुरंगीपाडस’ (2022), बिराडकार अशोक पवार यांची ‘गावखोरी’ (2024) आदी कादंबऱ्यांचा समावेश होतो. या कादंबरी लेखनाच्या माध्यमातून ग्रामीण शेतकऱ्यांच्या समस्यांना आणि ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांच्या बेरोजगारीला वाचा फोडण्याची संधी प्राप्त झाली आहे. आणि यातूनच लेखकांनी आपल्या व्यथा, वेदना साहित्याच्या रुपाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

ग्रामीण कादंबऱ्यांमधून शेतकऱ्यांचे दुःख. वेदना, समस्या व तसेच ग्रामीण भागातील शिक्षित तरुणांच्या बेरोजगारीचे चित्रण दिसून येते. ग्रामीण शेतकरी जीवनाची ओळख या संशोधनातून होणार आहे. यासाठीच हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

ग्रामीण कादंबरीकार हे संवेदनशील आहेत. त्यांना कादंबरी वाङ्मयाची उत्तम जाण आहे. ग्रामीण कादंबरीकार हे त्यांच्या कादंबरी लेखनातून समाजातील वेगवेगळ्या प्रश्नांवर प्रकाश टाकतात. हे त्यांच्या कादंबरी लेखनाचे वेगळेपण आहे. त्यांच्या कादंबरी लेखनाने एक वेगळी ओळख मराठी साहित्याला करून दिली आहे. ग्रामीण कादंबरी ग्रामीण भागातील माणसाचे प्रतिनिधित्व करते. म्हणूनच मी ग्रामीण कादंबरी वाङ्मयाचा संशोधनासाठी विषय निवडलेला आहे.

संशोधनाचे गृहितके:-

' मराठी ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास' या विषयानुषंगाने एक संशोधक अभ्यासक म्हणून संशोधन प्रबंधासाठी खालील गृहितके मांडून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

1) ग्रामीण कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवन-जाणिवा चित्रित झालेल्या आहेत.
2) ग्रामीण कादंबऱ्यांमधून शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदना यांचे चित्रण आलेले आहे.
3) ग्रामीण कादंबऱ्यांमधून ग्रामीण भागातील वातावरण व बदललेल्या ग्रामीण जीवनाचे चित्रण चित्रित झाले आहे.
4) ग्रामीण कादंबऱ्यांमधून ग्रामीण शेतकरी व तसेच ग्रामीण भागातील शिक्षित तरुण करत असलेल्या संघर्षाचे यथार्थ दर्शन घडून येते.
5) ग्रामीण कादंबऱ्यांत आशयदव्य आणि संरचना यांची नेटकी वीण पहावयास मिळते.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन करताना विविध संशोधन पद्धतीचा आधार घेऊन संशोधन करावे लागणार आहे. एखाद्या विषयाचा विविध पद्धतीने किंवा दृष्टिकोनातून अभ्यास केल्यास त्या विषयाला चांगल्या प्रकारे न्याय देता येतो. त्यासाठी प्रस्तुत संशोधन करताना चरित्रात्मक, ऐतिहासिक, सामाजिक, मानसशास्त्रीय, आस्वाद, मार्क्सवादी व सौंदर्यवादी संशोधन पद्धतीचा उपयोग करणार आहे.

विषयाची व्याप्ती व मर्यादा:-

ग्रामीण कादंबरीकार हे नवीन पिढीतील दमदार व दर्जेदार लेखक आहेत. त्यांनी कथासंग्रह,कवितासंग्रह, ललित लेखसंग्रह, बालकविता संग्रह, बालकथा संग्रह,कादंबरी अशा वेगवेगळ्या वाङमय प्रकारात लेखन केले असले तरी प्रस्तुत संशोधनामध्ये त्यांच्या प्रकाशित झालेल्या ग्रामीण कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास हा विषय मी निवडला आहे. हीच माझ्या संशोधनाची मर्यादा आहे. ग्रामीण कादंबरीकारांच्या कादंबरीत स्वभावदर्शन, त्यांनी हाताळलेले वेगवेगळे प्रश्न, त्यांच्या कादंबरीतील भाषाशैली, वातावरण, कथानक, कादंबरीतील संघर्ष, मानवी वृत्ती-प्रवृत्ती, संस्काराचे व संस्कृतिचे दर्शन इत्यादी घटकांचा सूक्ष्म अभ्यास संशोधनात करावयाचा आहे. ही माझ्या संशोधनाची व्याप्ती आहे.

कादंबरीकारांनी कादंबरी या वाङमय प्रकारातून गरीब शेतकऱ्याचे दुःख व वेदना मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात शेषेराव मोहिते यांची ‘धूळपेरणी’ (2001), सदानंद देशमुख यांची ‘बारोमास’ (2003), संजय जगताप यांची ‘बारदाणा’ (2004), बिराडकार अशोक पवार यांची ‘पडझड’ (2012), रवींद्र पांढरे यांची ‘पोटमारा’ (2016), नवनाथ गोरे यांची ‘फेसाटी’ (2017), महेंद्र कदम यांची ‘तणस’ (2019), कैलास दौंड यांची ‘तुडवण’ (2019), गणेश आवटे यांची ‘कुरंगीपाडस’ (2022), बिराडकार अशोक पवार यांची ‘गावखोरी’ (2024)’ या कादंबऱ्यांमधून एकविसाव्या शतकात ग्रामीण भागातील बदललेलं वातावरण आले आहे.

ग्रामीण कादंबरीकार यांच्या साहित्य लेखनातून आणि त्यांना मिळालेल्या पुरस्कारावरून त्यांचे साहित्य हे उत्तम व दर्जेदार असल्याची प्रचिती येते. लेखकाची ओळख साहित्य जगताला समीक्षा आणि संशोधनाने होत असते. त्यांचे साहित्य नवीन पिढीला प्रेरणादायी स्वरूपाचे आहे. एका वेगळ्या जगाची गंधवेदना त्यांच्या

साहित्यातून आविष्कृत होते. ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या व्यथा, वेदना त्यांच्या साहित्यातून आविष्कृत झाल्या आहेत, याचा शोध संशोधनातून घेण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

विषय निवडीची भूमिका:-

माणूस हा समाजशील प्राणी आहे. त्यामुळे त्याचे अनेक पातळीवरील कुतूहल ही एक नैसर्गिक घटना आहे. वाचनाच्या आणि श्रवणाच्या आवडीतून मराठी साहित्यातील अनेक कलाकृती आणि वाङमयीन प्रवाहाच्या अनुषंगाने झालेले लेखन वाचनात आले. अनेक साहित्यिक लेखक,विचारवंत, समीक्षकांच्या अभ्यासपूर्ण विवेचनाच्या आकलनातून मराठी साहित्यातील अनेक प्रवाहांपैकी ग्रामीण साहित्याचा प्रवाह अधिक परिणामकारक वाटुन ग्रामीण कादंबरी अधिक जवळची वाटायला लागली. वाङमयीन चळवळी, राजकीय स्थित्यंतरे, सामाजिक परिवर्तने यांच्या अनुषंगाने , ग्रामीण कादंबरी व तेथील जीवनमान बदलत गेले. , शेतकरी जीवन आणि ग्रामीण भागातील शिक्षित तरुणांची बेरोजगारी या संघर्षमय जीवनाचा मी एक घटक असल्यामुळे या जीवनाचा शोध घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली .आणि ग्रामीण कादंबरीत ग्रामीण शेतकरी आणि तेथे बेरोजगार असलेला शिक्षित तरुण यांच्यासमोर असलेल्या समस्या मांडल्या आहेत. म्हणून संशोधनासाठी मी “ निवड ग्रामीण कादंबऱ्या यांचा चिकित्सक अभ्यास” हा विषय निवडला आहे. प्रस्तुत कालखंडात ग्रामीण शेतकरी जीवन विविध समस्यामुळे गर्तेत अडकल्याचे दिसते. स्वार्थाधितेमुळे हरवत चाललेली माणुसकी ही अनेक कादंबरीकारांच्या कादंबरीचा विषय होऊन कादंबरी अवतरत होती. ग्रामीण जीवनातील समस्यांना निर्भिडपणे कादंबरीतून आविष्कृत करून शोषणमुक्त मानवतावादी नवसमाजाची स्वप्न पाहणारे लेखक सदानंद देशमुख, कैलास दौंड, शेषराव मोहिते, नवनाथ गोरे, बिराडकर अशोक पवार, गणेश आवटे, महेंद्र कदम, संजय जगताप, रवींद्र पांढरे आदी कादंबरीकारांची ग्रामीण जीवनाशी असलेली नाळ

घट्ट दिसते. अशा कादंबरी लेखकांच्या कादंबरीचा अभ्यास करुन त्यातील मानवी मूल्ये, वाङमयीन मूल्ये शोधण्यासाठी प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधन प्रकरणाची रचना :-

संशोधन कार्यासाठी संशोधकाने " मराठी ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडलेला आहे.

या प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करीत असतांना त्यात सुटसुटीतपणा व नीटनेटकेपणा यावा या हेतुने विषयाची रचना सात प्रकरणात करण्यात आली आहे.

प्रकरणे पुढील प्रमाणे :-

प्रकरण पहिले:-

कादंबरी वाङमय व मराठी ग्रामीण कादंबरी: उदय, विकास आणि स्वरूप

या प्रकरणातून कादंबरी वाङमय व मराठी ग्रामीण कादंबरीचा उदय, विकास आणि स्वरुप हे बघून त्यांच्या व्याख्यासहित परिचय करून घ्यायचा आहे.

प्रकरण दुसरे:-

ग्रामीण कादंबरीचे स्वरूप

संशोधनकार्यासाठी संशोधकाने " निवडक ग्रामीण कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडलेला आहे. यात निवडक ग्रामीण कादंबऱ्या म्हणून गावखोरी, धुळपेरणी, बारदाणा, तुडवण, कुरंगीपाडस, बारोमास इत्यादी, ग्रामीण कादंबऱ्या निवडलेल्या आहेत. म्हणून या , ग्रामीण कादंबऱ्याचे स्वरूप या प्रकरणात दाखवण्यात येईल.

प्रकरण तिसरे:-

ग्रामीण कादंबरीतील शेती, शेतकरी आणि ग्रामीणभाग

या प्रकरणात निवडक ग्रामीण कादंबरीतील पारंपारिक शेती कडून आधुनिक शेतीकडे झालेली शेतीची वाटचाल, त्याचे फायदे तोटे आणि शेतकरी जीवन व ग्रामीण जीवन याचा आढावा घेतला जाईल.

प्रकरण चौथे:-

ग्रामीण कादंबरीत होरपळणारा सुशिक्षित तरुण

या प्रकरणातून निवडक कादंबऱ्यात होरपळणाऱ्या सुशिक्षित तरुणाचा संघर्ष मांडण्यात येईल.

प्रकरण पाचवे:-

ग्रामीण कादंबरीतील व्यक्तिचित्रण

या प्रकरणात निवडक ग्रामीण कादंबरीतील व्यक्तिचित्रणाचे स्वरूप अभ्यासावयाचे आहे. यात पुरुष व्यक्तिचित्रण व स्त्री व्यक्तिचित्रण तसेच सुष्ट व दुष्ट व्यक्तिचित्रण, पात्रांचे स्वभावदर्शन, व्यक्ति व्यक्तिमधील संघर्ष, मानवी वृत्ती-प्रवृत्तीमधील संघर्ष लेखकांनी कसे घडविले आहे याचा शोध घ्यावयाचा आहे.

प्रकरण सहावे:-

ग्रामीण कादंबरीचे वाङमयीन मूल्यमापन

संशोधनाच्या सहाव्या प्रकरणात कादंबरीचे कथानक, संवाद, व्यक्तिचित्रण, निवेदनशैली, वातावरण, भाषाशैली, रसपरिपोष, अलंकार, प्रतिक, प्रतिमा, म्हणी, वाक्प्रचार, सुभाषितवजा वाक्य इत्यादी वाङमयीन विशेषाचा शोध निवडक ग्रामीण कादंबऱ्यांतून घ्यावयाचा आहे. त्या कादंबऱ्यांचे वाङमयीन मूल्यमापन करून त्यातील बलस्थाने आणि सौंदर्यस्थळे याचा शोध घ्यावयाचा आहे.

प्रकरण सातवे:-

निष्कर्ष आणि उपसंहार

प्रकरण एक ते सहा मध्ये संशोधनांती जे निष्कर्ष हाती येतील ते या प्रकरणात मांडण्यात येणार आहेत.

संदर्भ ग्रंथ सूची

1) शेषराव मोहिते - धूळपेरणी (2001)
2) सदानंद देशमुख - बारोमास(2003), चारिमेरा, तहान
3) संजय जगताप - बारदाणा (2004)
4) बिराडकार अशोक पवार - पडझड (2012)
5) रवींद्र पांढरे - पोटमारा (2016)
6) नवनाथ गोरे - फेसाटी (2017)
7) महेंद्र कदम - तणस (2019)
8) कैलास दौंड - तुडवण (2019), कापूसकाळ (2009), पाणधुई (2019)
9) गणेश आवटे - कुरंगीपाडस (2022)
10) बिराडकार अशोक पवार - गावखोरी (2024)
11) मराठी कादंबरीचे शतक - कुसुमावती देशपांडे
12) मराठी कादंबरीतील नैतिकता - डॉ. किशोर सानप
13) मराठी कादंबरी विश्लेषण आणि विवेचन - बालशंकर देशपांडे
14) डॉ. नागनाथ कोत्तापले - ग्रामीण साहित्य आणि शोध (मेहता प्रकाशन, पुणे)
15) डॉ. चंदकुमार नलगे (संपा)- ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास (सुरेश एजन्सीज्, पुणे)
16)डॉ. रवींद्र ठाकूर - मराठी ग्रामीण कादंबरी

(मेहता पब्लिशिंग, पुणे)

17)डॉ. द. ता. भोसले - ग्रामीण साहित्य एक चिंतन

(मनोविकास प्रकाशन, पुणे)

18)दत्ता देसाई -पाणी दुष्काळ आणि विकास

(प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी)

19)डॉ. आनंद यादव-आमीण साहित्य स्वरुप आणि समस्या

(मेहता पब्लिशिंग, पुणे)

20)डॉ. वासूदेव मुलाटे - ग्रामीण साहित्य स्वरुप आणि दिशा

(कैलास प्रकाशन, औरंगाबाद)

संशोधक

साईनाथ रामचंद्र काकडे

एम. ए., बी. एड (मराठी)

मु.पो. आरळ, ता. वसमत, जि. हिंगोली

मो. 9075793944.

ई-मेल:-sainathkakde123@gmail.com

मार्गदर्शक

प्रा. डॉ. कदम सुरेश व्यंकटराव

सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग)

राजर्षी शाहू महाविद्यालय, परभणी

मो. 9420531314

ई-मेल:-drsureshkadam11@gmail.co